वाचले:-१) श्री. रूपेश विलास चव्हाण व इतर रा. ५२१, ५०१, फ्युचर टॉवर, ॲमेनोरा पार्क, हडपसर, पुणे यांचा महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांचे कार्यालयाकडे केलेला दिनांक:- २२/११/२०२१ रोजीचा अर्ज.

२) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. बीएमयु/मौजे रावडे/ग.नं.३८१ व इतर/प्र.क्र.९६३/२१-२२/३२९, दि. ०९/१२/२०२१ रोजीचे पत्र.

३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ दिनांक-०५/०१/२०१७.

४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र.क्र.११५/ टी-१ दिनांक-१९ ऑगस्ट २०१७

---

**जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी**
**आणि ती वरील भार याबाबत पत्र**
**(महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२क)**

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
(महसूल शाखा)
क्र.मुळशी/एनए/एसआर/८१/२०२१
पुणे, दिनांक:- २१ /०२/२०२२

प्रति,

महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सयाजीराव गायकवाड,
उद्योग भवन औंध पुणे-०७

विषय:-जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र
मौजे रावडे, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन गट नंबर ३८१, ३८४, ३८५ व ३८७ मधील ३६२४.०६ चौ.मी. क्षेत्रास रहिवास प्रयोजनार्थ..

संदर्भ:-आपले कार्यालयाकडील पत्र क्र. बीएमयु/मौजे रावडे/ग.नं.३८१ व इतर/प्र.क्र.९६३/२१-२२/३२९, दि. ०९/१२/२०२१ रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकीत पत्रान्वये मौजे रावडे, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन गट नंबर ३८१, ३८४, ३८५ व ३८७ मधील ३६२४.०६ चौ.मी. क्षेत्रास रहिवास प्रयोजनार्थ रेखांकन/बांधकाम प्रयोजनासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम-१९६६ चे कलम-१८ नुसार रेखांकन/बांधकाम परवानगी मिळणेबाबत दिनांक-२२/११/२०२१ रोजी अर्जदार श्री. रूपेश विलास चव्हाण व इतर रा. ५२१, ५०१, फ्युचर टॉवर, ॲमेनोरा पार्क, हडपसर, पुणे यांनी आपले कार्यालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.

२. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र. क्र.११५/टी-१ दिनांक- १९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार आपण आपले कडील पत्र क्र. बीएमयु/मौजे रावडे/ग.नं.३८१ व इतर/प्र.क्र.९६३/२१-२२/३२९, दि. ०९/१२/२०२१ अन्वये सदर जमिनीच्या संदर्भातील भोगवटा/धारणाधिकार/अधिभार/अकृषिक आकारणी व इतर शासकीय देणी या मुद्दयांची माहिती मिळणेकामी प्रस्तुतचा प्रस्ताव व त्यालगतची कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर केलेली आहेत.

३. त्यानुसार महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र. क्र.११५/टी-१ दिनांक-१९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. (l) (२) (i) मधील **(अ)** ते (इ) मध्ये नमुद मुद्यांचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

४. **मौजे रावडे, तालुका मुळशी, जिल्हा पुणे** येथील खालील वर्णनाची जमीन जमिनमालक यांचे हक्कनोंदणीस दाखल आहे.

| अ.क्र. | जमिन मालकाचे नाव | ग. नं. | प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|
| १ | ज्योतीप्रसाद विलास चव्हाण<br>विशाल विलास चव्हाण<br>रूपेश विलास चव्हाण | ३८१ | १७२०.०० |
| २ | ज्योतीप्रसाद विलास चव्हाण<br>रूपेश विलास चव्हाण<br>विशाल विलास चव्हाण | ३८४ | ८६०.०० |
| ३ | ज्योतीप्रसाद विलास चव्हाण<br>रूपेश विलास चव्हाण<br>विशाल विलास चव्हाण | ३८५ | २८०.०० |
| ४ | ज्योतीप्रसाद विलास चव्हाण<br>रूपेश विलास चव्हाण<br>विशाल विलास चव्हाण | ३८७ | ८१०.०० |
| एकूण क्षेत्र | | | ३६७०.०० |
| अर्जदार यांनी रेखांकन/बांधकाम नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र | | | ३६२४.०६ |
| अकृषिक सारा आकारणीचे प्रयोजन | | | रहिवास |

५. विषयांकीत जमिन ही **भोगवटादार वर्ग-१** ची आहे.

६. नियोजात समाविष्ठ मिळकतीबाबत प्रकरणी समाविष्ठ ७/१२ पाहता सदरची मिळकत ही वतन संवर्गातील असलेचे दिसून येत नाही.

७. विषयांकीत जमिनीचे अधिकार अभिलेखाच्या इतर हक्कामध्ये अर्जदार यांचेशी संबंधित सोसायटीचा भार दिसून येत आहे. सदर बोजा कायम ठेऊन वस्तुस्थितीचा अहवाल आपले कार्यालयास सादर करणेत येत आहे.

८. सन-१९५० पासूनचे ७/१२ उतारे व त्यावरील फेरफार नोंद यावरुन सदरची जमिन खाजगी/ राखीव वनसंवर्गात मोडत नाही.

९. प्रस्तुत जमीन कुळकायदा संवर्गातील असलेचे दिसून येत नाही.

१०. प्रकरणी या कार्यालयाकडील **पत्र क्र. मुळशी/एनए/एसआर/८१/२०२१, दिनांक-०८/०२/२०२२** अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रूपांत्तरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आलेले होते.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणीचे प्रयोजन | रहिवास |
| २ | बिगरशेती आकारणी क्षेत्र (चौ.मी.) | ३६७०.०० |
| ३ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति चौ.मी.) | ०.१० |
| ४ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | ३६७.०० |
| ५ | रुपांतरीत कराची आकारणी | १८३५.०० |
| ६ | जिल्हा परिषद कर | २५६९.०० |
| ७ | ग्रामपंचायत कर | ३६७.०० |
| **वसूल करावयाची एकूण रक्कम रुपये** | | **५१३८.००** |

त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबत अर्जदार यांनी चलन **क्र. MH०१२८२३३९१२०२१२२M, दिनांक- ०८/०२/२०२२ व डिफेस चलन नंबर ०००६२७९३२२२०२१२२, दि. ११/०२/२०२२** या कार्यालयास सादर केले आहे.

११. नागरी कमाल जमिन धारणा कायद्यांतर्गत असलेल्या केसेस (यु.एल.सी.), कुलमुख्त्यारपत्र, वनजमीन, मोजणी नकाशा, जागा पाहणी, विद्युतवाहीनी, भुसंपादन, पर्यावरण विभाग ना-हरकत (Environment Clearance), एअर फोर्स, रेडझोन परिक्षेत्र (वर्क्स ऑफ डिफेन्स ॲक्ट) उदा.देहु ॲम्युनेशन डेपो, दिघी मॅगेझिन, उच्च ऊर्जा पदार्थ अनुसंधान प्रयोगशाळा (HEMRL), INS शिवाजी, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), पर्यावरण संवेदनशिल असलेली गांवे (ESA) इ. तांत्रिक बाबींची खात्री नियोजन प्राधिकारी म्हणुन **महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण, पुणे** यांनी त्यांचे स्तरावर करूनच रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी देणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे विषयांकीत जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, ती वरील अधिभार रूपांतरण कर, अकृषिक आकारणी तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी याबाबतची वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्यात येत आहे. तरी विषयांकीत जमिनीवरील रेखांकन/बांधकाम आराखडयांना उपरोक्त नमुद बाबींच्या पडताळणी अंती मंजूरी देण्याबाबत शासन परिपत्रक दि.१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (ii) मध्ये नमुद केलेप्रमाणे आपले स्तरावर विहित मुदतीत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

मा. अपर जिल्हाधिकारी सो
यांचे मान्यतेने

(हिम्मत खराडे)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

**प्रत:- श्री. रूपेश विलास चव्हाण व इतर रा. ५२१, ५०१, फ्युचर टॉवर, ॲमेनोरा पार्क, हडपसर,** पुणे.

शासन परिपत्रक दिनांक-१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण यांनी त्यांचे स्तरावर रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी दिलेनंतर **रेखांकन/बांधकाम परवानगीची साक्षांकीत प्रत या कार्यालयाकडे सादर करावी.** जेणेकरून प्रस्तुत जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ मध्ये जमिन अकृषिक झाल्याची नोंद घेणेकामी पुढील आवश्यक ती कार्यवाही करता येईल.

प्रत :- **तहसिलदार मुळशी** यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना सोबत मुळ संचिका पान क्र. १ ते १७३ जोडली असे.

नक्कल अर्ज क्रमांक नक्कल/एसआर, 1220/2022
नक्कल अर्ज प्राप्त दिनांक 1/6/2022
नक्कल तयार दिनांक 6/6/2022
नक्कल ... दिनांक 6/6/2022
नक्कल पाने 30
... 6
नक्कल ... सही
तपासणाऱ्याची सही

खरी नक्कल
6/6/22
जिल्हाधिकारी पुणे कार्यालय

(हिम्मत खराडे)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे